RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शालेय विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमतेची जाणीव आणि प्रसार माध्यमे

**डॉ. सौ. नंदिनी पाटील**
प्राचार्य,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
पुणे.

**प्रा.देवकर एम.बी.**
सहा. प्रा.
श्रीमती र.मोहिते–पाटील शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, अकलूज

आजची शिक्षणपध्दती ही विद्यार्थीकेंद्रीत शिषक्षणपध्दती असून विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेवून व्यक्तीमत्त्व विकास साधण्यावर आजच्या शिक्षण पध्दतीत भर दिला जातो. असे असताना सुध्दा विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक जीवनात निर्माण समस्या सोडवण्याचे सामर्थ्य पूर्ण अंशाने विद्यार्थ्यांमध्ये येत नाही ही बाब विद्यार्थी आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजाच्या दृष्टीने चिंताजनक ठरते.

शिक्षण पध्दतीत परीक्षेला दिलेले अवास्तव महत्त्व विभक्त कुटुंब पध्दती, पालकांचे मुलांकडे होणारे दुर्लक्ष आणि अनेक कारणे मुलांच्या निर्णयाच्या आड येताना दिसून येतात.

शालेय मुलांसमोरील या समस्यांच्या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेने 1993 मध्ये दहा जीवन कौशल्ये निर्धारीत केली. किशोरवयीन मुलांमध्ये ही जीवन कौशल्ये शिक्षणातून विकसित झाल्यास त्यांच्या समोरील समस्या कमी होतील व दैनंदिन जीवनातील अनेक समस्यांना ते प्रभावीपणे सामोरे जातील ही त्यामागची भूमिका.

WHO आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005) च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक वर्ष 2009 पासून प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात ही जीवन कौशल्ये समाविष्ट करण्यात आली. या दहा जीवनकौशल्यातील पाचवे व महत्त्वपूर्ण कौशल्य म्हणून निर्णयक्षमता हे कौशल्य ठेवण्यात आले.

**निर्णयक्षमता : अर्थ**

समस्येतून बाहेर पडण्यासाठी अनेक पर्यायांचा विचार करून समस्येचे पूर्णपणे निराकरण करण्यासाठी योग्य त्या पर्यायाची निवड करता येणे म्हणजे निर्णयक्षमता कौशल्य होय.

थोडक्यात निर्णयक्षमता ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्ती किंवा गट एखाद्या प्रसंगाच्या किंवा समस्येच्या संदर्भात माहिती गोळा करतो. मिळालेल्या माहितीचे पृथःकरण करतो आणि योग्य पर्यायाची निवड निश्चित करतो.

**निर्णयक्षमता उद्दिष्टे**

1. विद्यार्थ्याला स्वतःच्या बलस्थानांची उणिवांची माहिती होणे.
2- ध्येयनिष्चिती (Goal Setting)
3. स्वतःसाठी असणाऱ्या संधीची माहिती असणे.

**निर्णयक्षमता विकसन प्रक्रिया**

विविध प्रसंगातून विद्यार्थ्यावर निर्णय घेण्याची वेळ येत असते. निर्णय घेतो मात्र बऱ्याचवेळा निर्णय चुकतो. वडिलधाऱ्यांची बोलणी खावी लागतात. निर्णय घेण्याची वेळ आली की, गोंधळून जातो. पहिलीच पुनरावृत्ती होऊ नये अशी भीती वाटते व निर्णयापासून परावृत्त होतो.

**निर्णय प्रक्रियेमध्ये प्रसार माध्यमांची भूमिका**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणाचे युग आहे. प्रसार माध्यमे कानाकोपऱ्यात पोहोचली आहेत व जनसामान्यावर या प्रसार माध्यमांचा खूप प्रभाव दिसून येतो. समाजाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणे, समाजात जाणीव जागृती घडवून आणणे हे प्रसार माध्यमाचे खरे कार्य आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

मनोरंजनातून लोकशिक्षण देण्यात प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडतात. शालेय विद्यार्थ्यात निर्णयक्षमता विकसित करण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.




वर नमूद केलेली प्रसार माध्यमे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता कशी विकसित करू शकतील व त्यासाठी कोणते कार्यक्रम हाती घेवू  शकतील याची चर्चा याठिकाणी करणे उचित ठरते.

1. दर्जेदार शैक्षणिक चित्रपट शाळेत दाखवण्यात यावेत. उदा.तारे जमिनपर, दहावी फ, चक  दे इंडिया सामुदायिकरित्या दाखविण्यात यावेत.
2. परीक्षेच्या काळातील ताणतणाव व्यवस्थापन करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर, तज्ज्ञ शिक्षक, मानसोपचार तज्ज्ञ, समुपदेशक इ.चे मार्गदर्शन विविध उपक्रमातून करुन द्यावे.
3. विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींच्या मुलाखती, मार्गदर्शन शालेय विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रमातून उपलब्ध करून द्यावे उदा.मेधा पाटकर, किरण बेदी.
4. शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या विविध स्पर्धा, पुरस्कार व कार्यक्रमांना प्रसिध्दी देणे उदा.वेगवेगळया क्षेत्रात दिले जाणारे पुरस्कार.
5. थोर व्यक्तींच्या कार्यांना विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर आणणे उदा.आनंदवन–बाबा आमटे, डॉ. अभय बंग, राणी बंग.
6. विविध शास्त्रज्ञांचा जीवन प्रवास विविध कार्यक्रमातून पुस्तकांमधून विद्यार्थ्यांसमोर आणणे उदा.डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ.विजय भटकर.
7. खडतर प्रवास करून स्वतःचे निर्णय स्वतः घेऊन यशस्वी झालेल्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती प्रसिध्द करणे उदा.विश्वास नांगरे–पाटील.

वर सूचित कार्यक्रम नमुना दाखल देण्यात आले आहेत. असे कार्यक्रम घेता येतील ज्यामुळे विद्यार्थ्यांची निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होईल. प्रसार माध्यमांकडून सृजनशील विचार अंगिकारण्याची व सामाजिक  बांधिलकलीच्या  दृष्टीकोनातून प्रामाणिक  प्रयत्न होण्याची गरज आहे.

## संदर्भसूची


- प्राथमिक  शिक्षण अभ्यासक्रम 2004, शिक्षक  मार्गदर्शिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक  संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे–30.
- जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका इयत्ता 5 वी ते 7 वी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक  संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे.
- दुनाखे अरविंद, शालेय व्यवस्थापन व प्रशासन(2005), नूतन प्रकाशन, पुणे.
- Life skill Education, Article of Bhuvaneshwara Lakshi University Vol. 47, No.08 Feb.23 March 01, 2009.
- WHO (2004) Skill for Health an Important Entry point for health promoting Child, Friend Schools, Geneva.